## निशाणी क्र.४९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ सह कलम १५१ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द सरस–निरस मानाने वाटपाचा व असलेला कब्जा पृथकपणे होऊन मिळणेबाबत दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ कुसुम जगन्नाथ शिंदे या दि.०८.०९.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस हे वादी व प्रतिवादी क्र.१,२,३ असे आहेत. ते अगोदरच दाव्याकामी पक्षकार असल्याने सदरील प्रतिवादी क्र.४ कुसुम जगन्नाथ शिंदे यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.४ कुसुम जगन्नाथ शिंदे यांचे नावासमोर कंस करुन त्या समोर मयत नाव कमी असे लिहिण्यास परवानगी असावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतचे अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा असलेचे नमूद करुन अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द सरस–निरस मानाने वाटपाचा व असलेला कब्जा पृथकपणे होऊन मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.४ कुसुमताई जगन्नाथ शिंदे या मयत झाल्या असून त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र हे नि.क्र.४८ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. वादी यांच्या मागणी प्रमाणे सदरचे नाव दाव्यातून कमी केले तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार

नाही व दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे, न्यायाचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

**आदेश**

१. वादीचा निशाणी क्र.४९ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने मागणीप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादी यांना देखील पुरविणेत यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.11.15 18:35:00 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
दि.१५.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude. |
| Name of the Court | :- | Smt. V.D. Shirse,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 15.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 15.11.2025 |
| Order uploaded on | :- | 15.11.2025 |